

# SHIKSHAN MAHARSHI GURUVARYA R G SHINDE MAHAVIDYALAYA, PARANDA DIST. OSMANABAD (MS)-413502

**Telephone: 02477 232143**
**E-mail:** shindecollege067@rediffmail.com **Website:** https://www.rgsmparanda.org/

**NAAC Reaccredited with 'A' grade with CGPA 3.15 in 3rd Cycle**

## AQAR 2020-21

## CRITERION 3

## RESEARCH, INNOVATIONS AND EXTENSION

3.4.3 Number of extension and outreach Programmes conducted by the institution through NSS/ NCC/Government and Government recognized bodies during the year

Submitted to

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

## Translation of Report (International Yoga Day)

International yoga day was celebrated in the college today on 21st June 2020. District Sports Officer's Office Aurangabad, Shri Sant Sawta Mali Rural College, Fulambri, Shivaji College, Kannada, Sant Ramdas College, Ghansawangi, Shikshan Maharshi Guruvarya R. G. Shinde College, Paranda and B.Sc. S. Patel College, Pimpalgaon Kale jointly celebrated event. The program was inaugurated by Principal Dr. Vijay Bhosale, Kannada. On this occasion, Principal Dr. Subhash Takle, Fulbari, Principal Dr. Deepa Sawale, Paranda, Sports Officer Shri. Gokul Tandale, Principal Dr. Income. A. Raja, Pimpalgaon Kale, Dr. Bappasaheb Mhaske, Shri. Suresh Mirkar, Yogacharya Pvt. Dr. Babarao Sangale and others were present. 832 professors, teachers, yoga lovers, athletes from various colleges participated in this program.


| | |
|---|---|
| Topic | International Yoga Day |
| Time | Jun 21, 2020 07:00 AM Mumbai, Kolkata, New Delhi |
| Join Zoom Meeting | https://us02web.zoom.us/j/86846727302?pwd=V2dyN2Z1VEpWWXpEQkJobjQ2elNFdz09 |
| Meeting ID | 868 4672 7302 |
| Password | 218095 |






# शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालयात ऑनलाईन आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त प्रात्यक्षिक व कार्यशाळा संपन्न

परांडा दि. २२ (प्रतिनिधी) - येथील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय परंडा ,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय औरंगाबाद ,श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फूलंब्री,संत रामदास महाविद्यालय घनसावंगी आणि बी एस पटेल महाविद्यालय पिंपळगाव काळे यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त एक दिवशीय प्रात्यक्षिक व कार्यशाळा संपन्न झाली . या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ विजय भोसले सर यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ दीपा सावळे ,डॉ सुभाष टकले, औरंगाबाद जिल्हा क्रीडा अधिकारी प्रा गोकुळ तांदळे, प्राचार्य डॉ आय ए राजा पिंपळगाव काळे, डॉ बाबासाहेब मस्के, जिल्हा योगा संघटनेचे श्री सुरेश मिरकर ,योगाचार्य प्रा डॉ बाबाराव सांगळे आदींची उपस्थिती होती. या कार्यशाळेमध्ये एकूण ८३२ प्राध्यापक, शिक्षक ,योग प्रेमी विविध महाविद्यालयाचे खेळाडू यांनी सहभाग नोंदवला होता. सदर कार्यशाळेचे आयोजन प्रा डॉ कृष्णा परभणे, डॉ नितीन मालेगावकर ,डॉ रोहिदास गाडेकर आदींनी केले होते. या कार्यशाळेमध्ये उद्घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ भोसले म्हणाले की , प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, त्यामुळे प्रत्येकांनी दररोज योगा करणे गरजेचे आहे. प्राचार्या डॉ दीपा सावळे यांनी सांगितले की योगा हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे .योगामुळे आपले मन, शरीर तंदुरुस्त राहते आणि आपले आयुर्मान वाढले जाते. योगा हा केवळ २१ जून रोजी न करता वर्षभर योगा केल्याने आपले शरीर आपले मन तंदुरुस्त राहून आपल्यापासून अनेक रोग दूर राहतात. प्रतिकार शक्ती टिकून राहते. जिल्हा क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे यांनी ही योगा विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. योगाचार्य प्रा डॉ बाबाराव सांगळे बुलढाणा यांनी योगाचे विविध प्रात्यक्षिक करून दाखविले आणि योगाचे जीवनात महत्व काय आहे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सर्व उपस्थित सहभागी प्राध्यापक शिक्षक क्रीडाशिक्षक सर्वांनी या कार्यशाळेचा आस्वाद घेतला. सुत्रसंचालन डॉ संदीप जगताप यांनी केले, प्रस्ताविक डॉ पांडुरंग कल्याणकर यांनी केले तर आभार शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉक्टर विजय डोंगरे यांनी मानले.



# Translation of Report (Tree Plantation)

On 5th October 2020 tree plantation program was done in presence of Shri Sanjay Nimbalkar so, secretary Shri Bhavani Shikshan Prasarak Mandal Osmanabad.












## Translation of Report (Vachan Prerana Din)

On the occasion of birth anniversary of Dr. A. P. J. Abdul Kalam institute celebrated Vachan Prerana Din on 15/10/2020. On this occasion library organized Book exhibition for neighboring community which was inaugurated by Principal Dr. Deepa Sawale madam. Library created one documentary on this occasion. (YouTube link https://www.youtube.com/watch?v=yLeOAaBjULY )

दिव्य मराठी उस्मानाबाद जिल्हा 16-10-2020

# अवांतर वाचन करून आकलन शक्ती वाढवावी : डॉ. सावळे



परंडा । अवांतर वाचनाने आकलनशक्तीत वाढ होते. त्यामुळे प्रत्येकाने अवांतर वाचन करावे, असे आवाहन प्राचार्या डॉ. दीपा सावळे यांनी केले. त्या माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात बोलत होत्या.

येथील गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय, संत गाडगेबाबा महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात डॉ. कलाम यांची जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्या डॉ. दीपा सावळे यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. ग्रंथपाल डॉ. राहुल देशमुख यांनी ग्रंथालयाच्या वतीने डॉ. कलाम यांच्या जीवनावर आधारीत अनेक पुस्तकांचे प्रदर्शन ठेवले. प्रदर्शनाचे उद्‌घाटन डॉ. दीपा सावळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. शहाजी चंदनशिवे ,डॉ. अक्षय घुमरे, डॉ. कृष्ण परभणे, प्रा. सज्जन यादव उपस्थित होते. प्राचार्या डॉ. दीपा सावळे म्हणाल्या की, मुलांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी, वाचनाचे महत्त्व समजावे, अवांतर वाचनाची गोडी लागावी व ती निर्माण व्हावी हाच वाचन प्रेरणा दिनाचा उद्देश आहे. प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, समाजातील प्रत्येक व्यक्तीने दररोज एक तरी पुस्तक वाचावे, एक पान लिहावे कारण पुस्तक वाचल्याने आपल्या ज्ञानात भर पडते आणि ती भर आपल्याला भावी आयुष्यासाठी चांगला मार्ग दाखविते. यावेळी महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



SHRI BHAVANI SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

**SHIKSHAN MAHARSHI GURUVARYA R. G. SHINDE MAHAVIDYALAYA,**

**PARANDA- DIST. OSMANABAD**

**NAAC REACCREDITED WITH 'A' GRADE WITH CGPA 3.15**

## Translation of Report (Constitution day)

Institute celebrated constitution day on 26th November 2020. On this worshipped the image of Babasaheb Ambedkar. A two-minute silence was observed to pay tribute to the martyrs of 26/11 terror attacks.

(https://sakshipawanjyot.com/853)



पुरोगामी विचाराचे **लोकमत**

**रा. गे. शिंदे महाविद्यालयात संविधान दिन साजरा**

**परंडा** : येथील शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळभ प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे, प्रा. डॉ सचिन चव्हाण, ग्रंथालयाचे विभाग प्रमुख डॉ राहुल देशमुख, प्रा सजन यादव, प्रा विद्याधर नलवडे, प्रा. जगन्नाथ माळी, डॉ गजेंद्र रंदील, डॉ अक्षय घुमरे, डॉ अरुण खर्डे, प्रा. कृष्णा लांडगे, डॉ बाळासाहेब राऊत, डॉ. बी.वाय. माने, प्रा अंकुश शंकर, डॉ कृष्णा परभणे, प्रा.दत्ता मुळीक, प्रा प्रताप घुटे तसेच शिक्षकेतर कर्मचारी बाबासाहेब क्षिरसागर, अनिल जानराव, वसंत राऊत, हनुमंत मार्तंडे, दत्ता अतकर, दीपक ओहाळ, उत्तम माने आदी कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ शहाजी चंदनशिवे यांनी केले तर आभार प्रा डॉ. सचिन चव्हाण यांनी मानले.



उस्मानाबाद महाराष्ट्र

### रा गे शिंदे महाविद्यालयात संविधान दिन साजरा

November 26, 2020 / Sakshi Pawan Jyot

परांडा – शहरातील शिक्षण महर्षी गुरुवर्य आर जी शिंदे महाविद्यालयात दि 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य डॉ.प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. तसेच दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना दोन मिनिटे मौन बाळगून श्रद्धांजली वाहण्यात आली तर भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सर्वप्रथम वाचन केले आणि सर्वांनी पाठीमागे वाचन केले. यावेळी महाविद्यालयातील कनिष्ठ वरिष्ठ विभागाचे प्राध्यापक,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.सचिन चव्हाण, ग्रंथालयाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.राहुल देशमुख, बि होक विभागाचे प्रा.सजन यादव, नॅक विभागाचे समन्वयक प्रा.विद्याधर नलवडे ,प्रा.जगन्नाथ माळी, डॉ.गजेंद्र रंदील, डॉ.अक्षय घुमरे, डॉ.अरुण खर्डे, प्रा.कृष्णा लांडगे, डॉ. बाळासाहेब राऊत,डॉ.बी वाय माने,प्रा.अंकुश शंकर,डॉ.कृष्णा परभणे,प्रा.दत्ता मुळीक,प्रा.प्रताप घुटे तसेच शिक्षकेतर कर्मचारी बाबासाहेब शिरसागर,अनिल जानराव,वसंत राऊत ,हनुमंत मार्तंडे, दत्ता अतकर,दीपक ओहाळ व उत्तम माने आधी कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.सचिन चव्हाण यांनी मानले.यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांस्कृतिक विभाग,राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि संत गाडगेबाबा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतीक विभाग प्रमुख डॉ.शहाजी चंदनशिवे यांनी केले होते.

Post Views: 102

Like

## Translation of Report (Law workshop)

Anti-sexual Harassment committee and department of political science organized Law awareness workshop in collaboration with Taluka Vidhi Seva Samiti Paranda and Bar Association Paranda on 01/11/2020. 10 faculty members along with 35 students participated in this event.













## Translation of Report (Blood Donation)

To support victims of Covid-19 pandemic institute has organized blood donation camp on 31st December 2020. This program was inaugurated by Principal Dr. Deepa Sawale by garlanding the photograph of late R. G. Shinde Guruji. Over all 31 donors have donated their blood.



गौरव पत्र

श्री भगवंत ब्लड बँक

भव्य रक्तदान शिबीर

दिनांक : २३/१२/२०२०

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रा. गे. शिंदे महाविद्यालय परंडा

सन्माननीय, डॉ. दीपा सावळे, प्राचार्य

आपल्या संस्थेने २३।१२।२०२० रोजी रा. गे. शिंदे महाविद्यालय, परंडा

येथे रक्तदान शिबिर आयोजित करून ३१ रक्तदात्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले.

श्री भगवंत ब्लड बँकेच्या माध्यमातून चालू असलेल्या समाजकार्याला मोलाचा हातभार लावला

आहे. या कार्याबद्दल आम्ही आपल्या संस्थेविषयी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

चेअरमन

शशिकांत रा. जगदाळे

श्री भगवंत ब्लड बँक, बार्शी.

ऑ. लामकाने बिल्डिंग पहिला मजला, कुर्डूवाडी नाक्या जवळ, बार्शी - ४१३ ४११. फोन नं : ०२१८४-२२२६५५

करा रे करा रक्तदान या बांधवांसी जीवदान....












# Translation of Report (Different Competitions)

On 25th February 2021 institute in collaboration with Municipal Corporation and Shri Sant Bhagawan Baba Bahuudeshiya Sevabhavi Sanstha Vasamat Dist Hingoli, organized drawing and essay writing completion. 52 students participated in drawing competition and 76 participated in essay writing completion.

(https://sakshipawanjyot.com/2039) Link of News article







https://sakshipawanjyot.com/2039

उस्मानाबाद महाराष्ट्र

## रा.गे.शिंदे महाविद्यालयामध्ये स्वच्छता संदर्भात चित्रकला व निबंध स्पर्धा संपन्न

February 25, 2021 / Sakshi Pawan Jyot

- परंडा :- दि.२५ फेब्रुवारी २०२१ येथील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालयांमध्ये नगरपरिषद परांडा जिल्हा उस्मानाबाद व श्री संत भगवान बाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वसमत जिल्हा हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी अंतर्गत स्वच्छता संदर्भात विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील आयक्यूएसीचे चेअरमन प्रा.डॉ. महेशकुमार माने उपस्थित होते तर समन्वयक म्हणून महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे , प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषद सिटी समन्वयक महेश एकशिंगे , श्री संत भगवान बाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वसमत या संस्थेचे प्रकल्प अधिकारी अमोल बोंदर, भैरवनाथ बोंदर तसेच या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.डॉ. प्रकाश सरवदे, प्रा.डॉ.अक्षय घुमरे ,प्रा.डॉ.सचिन चव्हाण, प्रा.संतोष काळे ,प्रा.सज्जन यादव आदी उपस्थित होते . या स्पर्धेमध्ये चित्रकला स्पर्धेसाठी एकूण 52 विद्यार्थी तर निबंध स्पर्धेमध्ये एकूण 76 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता . यावेळी कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ. शहाजी चंदनशिवे यांनी केले .प्रमूख पाहूणे महेश एकसिंगे यांनी स्वच्छता संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर अध्यक्ष समारोप करताना प्रा.डॉ. महेशकुमार माने यांनी स्वच्छता आरोग्यासाठी किती महत्त्वाची आहे याविषयी माहिती सांगत सर्वांना स्पर्धेच्या शुभेच्छा दिल्या . या स्पर्धेसाठी स्वच्छता नागरिकांची जबाबदारी (कचरामुक्त परंडा शहर ) आपले कोरोणा योद्धे, माझे कुटुंब माझी जबाबदारी ,माझी वसुंधरा ,प्लास्टिक बंदी ,आणि स्वच्छ सर्वेक्षण 2021 या विषयावर स्पर्धा घेण्यात आली .
  या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकास १५०० रुपये आणि प्रमाणपत्र द्वितीय क्रमांकास ११०० रुपये आणि प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांकास 701 रुपये आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे . तसेच जे विद्यार्थी सहभागी झाले आहेत त्या सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे डॉ.महेशकुमार माने यांनी सांगितले.नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दिपक इंगोले महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीपा सावळे आदी मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचे पारीतोषिक देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे यांनी दिली . स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी सहकार्य केले.


## Translation of Report (World Wide Life Day)

Department of zoology and science forum in collaboration with Ramkrishana Paramhansa Mahavidyalaya Osmanabad and S P College Bhoom celebrated National Science day and World Wide Day on 05th March 2021. 37 students participated in this event.










05/03/2021

आज दिनांक 05/03/2021 रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन आणि जागतिक वन्यजीव प्राणी दिन दिन कार्यक्रम घेण्यात आला. [illegible]

| अ. क्र. | उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी | वर्ग | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 1. | Garad Priti Kalidas | B.Sc Fy | |
| 2. | Godage Vaishnavi Vijay | B.Sc Fy | |
| 3. | Korpude Saleha Khayyum | B.Sc Fy | |
| 4. | Lukade Fatima Salim | B.Sc Fy | |
| 5. | Pitli Alheda M.Gous | B.Sc Fy | |
| 6. | Vijapure Nida Maksud. | B.Sc Fy | |
| 7. | Neel Roshani Bapu | B.Sc Fy | |
| 8. | Dongare Sayali Shriram | B.Sc Fy | |
| 9. | Morve Humerabanu L. | B.Sc Fy | |
| 10 | Baraskar Divya Tukaram | Bsc Ty | |
| 11 | Patel Saniya Taher | Bsc Ty | |
| 12 | Devkar Sukanya Navnath | BSc TY | |
| 13 | Kopnar Rupali Subhash | BSc TY | |
| 14 | Pawar Amruta Dilip | B.Sc TY | |
| 15 | Mujawar Bushra Nuroddin | B.Sc Ty | |
| 16 | Shahane Bhagyashree Dasharath | B.Sc Ty | |
| 17 | Hatkar Mohini Jagannath | B.SC TY | |
| 18 | Mishra Ankita Santosh | B.Sc Ty | |
| 19) | Kale Reshma Ramrao | B.Sc Sy | |
| 20) | Mujawar Halima Mazaboddin | B.Sc. Sy | |
| 21 | Patil Rutuja Tanaji | B.SC. TY | |



| | | | |
|---|---|---|---|
| 24) | Garad Vaishnavi Mahadev | B.Sc Fy | |
| 25) | Khaire Rajkanya Shriram | B.Sc Fy | |
| 26) | Jadhav Swati Vaijinath | B.Sc Fy | |
| 27) | Shaikh Anwar A.Gani | B.Sc T.Y. | |
| 28) | Baraskar Nilesh Dnyandev | B.Sc. S.Y | |
| 29) | Khaire Kiran Vitthal | B.Sc. Sy | |
| 30) | Shejal Laxman Baban | B.Sc. Sy. | |
| 31) | Landage Akshay Babaso | B.Sc. Sy | |
| 32) | Zambare Vijay Mahadev | B.Sc TY | |
| 33) | Aniket Dattu Chandanshive | B.Sc TY | |
| 34) | Meher Mahesh Sudhir | B.Sc Sy | |
| 35) | Jagadale Nishigandha Sunil | B.Sc. T.Y. | |
| 36) | Mule Ashwini Ashrudas | B.Sc. T.Y. | |
| 37) | Mane Nilam Shivaji | B.Sc Ty | |

Principal
Shikshanmaharshi Guruvarya R.G.Shinde Mahavidyalaya,Paranda Dist.Osmanabad



# वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे

## स्वाती जाधव : वन्यजीव दिन कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

परंडा : वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे. त्यांनी ते कर्तव्य पार पाडले, तरच पर्यावरणाचा समतोल टिकून राहील, असे प्रतिपादन उस्मानाबादच्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील प्रा.डॉ.स्वाती जाधव यांनी केले.

येथील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे. शिंदे महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन आणि जागतिक वन्यजीव दिन हा एक दिवशीय विभागीय कार्यक्रम विज्ञान फोरम आणि प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.दीपा सावळे तर व्यासपीठावर भूमच्या शंकरराव पाटील महाविद्यालयाचे डॉ.नितीन पडवळ, प्रा.विद्याधर नलवडे, प्रा. डॉ. अतुल हुंबे, डॉ.शहाजी चंदनशिवे, प्रा.अमर गोरे-पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचलन डॉ.शहाजी चंदनशिव यांनी केले. प्रा.विद्याधर नलवडे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रा.दीपक तोडकरी, प्रा.जगन्नाथ माळी, प्रा. डॉ. कृष्णा परभणे, प्रा.डॉ.सचिन चव्हाण आदी उपस्थित होते. आभार डॉ. चव्हाण यांनी मानले.

# Translation of Report (World Women's Day)

On 8th March 2021 Institute celebrated world woman's Day. On this occasion Principal D D Sawale delivered inspirational speech to students more than 50 students along with teachers participated in this event. Event was organized by Kranti Jyoti Savitribai Phule Yuvati Manch, Anti-sexual Harassment committee and NSS department.

(https://sakshipawanjyot.com/2215) Link of News article







https://sakshipawanjyot.com/2215

उस्मानाबाद महाराष्ट्र

## महिलांना बदनाम करण्याचा प्रयत्न गेल्या अनेक वर्षापासून केला आहे – प्राचार्या डॉ.दीपा सावळे .

March 8, 2021 / Sakshi Pawan Jyot

परांडा – महिलांना बदनाम करण्याचा प्रयत्न गेल्या अनेक वर्षापासून केला जात आहे त्यामुळे केवळ महिला दिना दिवशी महिलांचा सन्मान करणे हे कितपत योग्य आहे ,आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर महिला अतिशय महत्त्वाचा समाजाचा घटक आहेत भितीपोटी महिलांच्या मध्ये अंधश्रद्धा निर्माण झाली आहे. पुरुषांनी कधीच अंधश्रद्धेच्या बाहेर महिलांना पडू दिले नाही . खरे तर पुरुषांनी ठामपणे महिलांना वास्तव सांगितले पाहिजे. महिलांनी स्वावलंबी आत्मनिर्भर बनले पाहिजे स्वतःला शिस्त लावली पाहिजे स्वयं नियंत्रण त्यांनी केले पाहिजे तरच महिला स्वतंत्रपणे आहे असे मत शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ दीपा सावळे यांनी रोजी
जागतिक महिला दिन आयोजित करत असताना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वरील उद्गार काढले .
महाविद्यालयातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले युवती मंच, महिला लैंगिक छळ व तक्रार निवारण समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यक्रमाचे दि.8 मार्च रोजी
आयोजन करण्यात आले होते .कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे यांनी केले होते . या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून प्राचार्या डॉ.दीपा सावळे या उपस्थित होत्या तर व्यासपीठावर प्राचार्या डॉ. दीपा सावळे, प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.हरिश्चंद्र गायकवाड ,राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. सचिन चव्हाण हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कु. जेतवणी मिसाळ ,कु अमृता अलबते यांच्यासह प्रा.डॉ. हरिश्चंद्र गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. सचिन चव्हाण यांनी मानले . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ. राहुल देशमुख, प्रा.सचिन साबळे ,शिक्षकेतर कर्मचारी दत्ता आतकर, हनुमंत मार्तंडे यांनी सहकार्य केले

Post Views: 81

Like

## Translation of Report (Mask Distribution and tree plantation)

On Shikshan Maharshi Guruvarya R G Shinde Mahavidyalaya distributed one mask and one tree in the village Rui adopted by Institute for five years also made peoples aware about Covid-19 on 12 July 2021.







वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय आता ६२ वर्षे

जनमत
सर्वसामान्यांचे

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

पीयुष गोयल यांना मोठी जबाबदारी; राज्यसभेत सभागृहनेतेपदी नियुक्ती

दैनिक उस्मानाबाद e-mail - dainikjanmat@gmail.com गुरुवार १५ जुलै २०२१ वर्ष २७ अंक २१५ पृष्ठे ८ किंमत ४ रुपये

**कोरोनामुक्त अंतर्गत रुई गावात रा.गे.शिंदे महाविद्यालयाच्या वतीने मास्क वाटप व वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न**

परंडा दि.१४ (प्रतिनिधी)- परंडा येथील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे शिंदे महाविद्यालय आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने कोरोना मुक्त अंतर्गत रुई गावांमध्ये मास्क वाटप आणि वृक्ष लागवड कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.दीपा सावळे या उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सचिन चव्हाण, प्रा.सचिन साबळे आणि सांस्कृतिक विभाग प्रमख डॉ.शहाजी चंदनशिवे यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी रुई गावच्या सरपंच कुसुम जगताप, उपसरपंच मीराबाई राजेंद्र लिमकर व सदस्य सुमित लिमकर, सुहास मळीक,राजेंद्र पाटील आणि पोलीस पाटील विलास पाटील हे यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सचिन चव्हाण यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.शहाजी चंदनशिवे यांनी केले होते. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. दिपा सावळे यांनी उपस्थित सर्व गावकऱ्यांना कोविड-१९ च्या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच नॅक या अतिश्य महत्त्वाच्या टीमसोबत गावकऱ्यांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल सर्वांचे आभार मानले. गावातील सर्व लोकांनी स्वतःची काळजी घ्यावी गावामध्ये कोणताच रोग येणार नाही यासाठी सर्वांनी स्वतःची आणि गावाची स्वच्छता ठेवावी, प्रतिकारशक्ती वाढावी म्हणन सर्वांनी लस घ्यावी स्वतःची घराची आणि समाजाची काळजी घेणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आम्ही महाविद्यालयाच्या वतीने आपल्या गावांमध्ये विविध उपक्रम राबवत आहोत रुई गाव हे महाविद्यालयाने दत्तक घेतले आहे तेव्हा आपला समन्वय महत्त्वाचा आहे असे यावेळी प्राचार्या डॉ.दिपा सावळे यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व गावकऱ्यांना मास्क चे वाटप करण्यात आले तसेच सर्वांना एक एक झाड देण्यात आले व गावामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी गावातील सर्व प्रतिष्ठित मंडळी कोविड -१९ चे पालन करत मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ.सचिन चव्हाण यांनी मानले.








SHRI BHAVANI SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

**SHIKSHAN MAHARSHI GURUVARYA R. G. SHINDE MAHAVIDYALAYA,**

**PARANDA- DIST. OSMANABAD**

**NAAC REACCREDITED WITH 'A' GRADE WITH CGPA 3.15**

# Translation of Report (Tree Plantation)

On the occasion of International Literacy Day and birth anniversary of founder president R. G. Shinde Guruji institute organized tree planation camp and planted 50 trees in premises and neighboring society. The program was conducted on 08/09/2021.



पुरोगामी विचाराचे

एकमत

## रा. गे. शिंदे महाविद्यालयात वृक्षारोपण

**परंडा** : शहरातील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे. शिंदे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त आणि शिंदे गुरुजी यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि.८) महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीपा सावळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. सचिन चव्हाण, प्रा. सचिन साबळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शहाजी चंदनशिवे यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रकाश सरवदे, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. अतुल हुंबे, डॉ. विद्याधर नलवडे, डॉ. कृष्णा परभणे, प्रा. अमर गोरे पाटील, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. संजीवन गायकवाड यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

